‘‘मराठवाड्यातील बालगृहातील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आंतरविद्याशाखेच्या समाजकार्य विषयात पीएच.डी पदवीसाठी सादर करावयाचा

संशोधन पुर्व आराखडा

संशोधक

कंधारकर हनमंत नारायण

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मार्गदर्शक

डॉ. घनःश्याम येळणे

प्राध्यापक

सामाजिकशास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मराठवाड्यातील बालगृहातील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका

प्रस्तावना

आजचा बालक देशाचा व भावी पिढीचा आधारस्तंभ आहे. त्याला सक्षम बनविणे हि समाजातील प्रत्येक घटकांची जबाबदारीच नाही आद्यकर्तव्य आहे. मानवाला जीवन जगण्याचा, स्वातंत्र्याचा, अन्याय, अत्याचार, पिळवणूक यापासून संरक्षणाचा आणि मुक्तीचा अधिकार भारतीय घटनेने व मानवी हक्काच्या जाहिरनाम्यानुसार प्राप्त झालेले आहेत. हे अधिकार बालकांनाही आपोआपच प्राप्त झालेले आहेत. मात्र देशातील बालके हे विविध समस्येला बळी पडलेले पहावयास मिळतात. देशात लाखो अनाथ, निराधार, हरवलेली बालके, भिक मागणारी, मजुरीला बळी गेलेली, अवैध कृत्यासाठी व लैंगिक दुरूपयोगाला बळी पडलेली बालके आढळून येतात. तसेच कुपोषण विविध रोगाला बळी गेलेली बालके तसेच शोशण व छळाला बळी गेलेली, विधीसंघर्षग्रस्त बालके अशा अनेक सामाजिक, मानसिक व शारिरीक समस्यांनी पछाडलेली आहेत. यातुन बालकांच्या मानवी हक्कांचे उल्लघन व संरक्षणाचा प्रश्न निर्माण होतो.

बालकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांना त्यांचे हक्क, संरक्षण मिळवून देण्यासाठी व त्यांच्या विकासात्मक गरजा पुर्ती करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरून विविध उपक्रम,आयोग तसेच कायद्याची अंमलबजावणी होताना दिसून येते. आंतरराष्ट्रीय स्तरावरून 1925 पासून बालकांच्या नैसर्गिकरित्या प्राप्त झालेल्या हक्कांची जोपासना व संरक्षण देण्यासाठी विचार सुरू झाला. सर्वप्रथम बालकांच्या सर्वांगीण विकासाचे व निसर्गतः प्राप्त झालेल्या अधिकारांचे निश्चित ध्येय साकारण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने 1959 ला बालहक्काचा जाहिरनामा स्विकारला. 1946 ला बालविकासासाठी युनिसेफची स्थापना केली. 1979 ला आंतरराष्ट्रीय बालकवर्ष जाहीर केले. 1989 ला बालहक्काचा करार व 1991 ला मुलांच्या हक्कासंबंधीची समितीची स्थापना केली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेने अंगिकारलेल्या बाल हक्कांबाबतच्या अधिसभेने 11 डिसेंबर 1992 रोजी भारत सरकारनेही बालकांच्या सर्वोत्तम हिताचे संरक्षण करण्याचे स्वीकारले. संयुक्त राष्ट्रसंघाने स्वीकारलेल्या बालकांच्या संहितेचे पालन ही करण्यात येवु लागले आहे. देषातील बालकांच्या विकासासाठी त्यांच हक्क जोपासण्यासाठी व संरक्षण देण्याहेतू 1993 ला केंद्रीय पातळीवरून महिला व बालविकास विभागाची स्थपना करण्यात आली. तसेच शासकीय पातळीवरून बालराष्ट्रीय धोरण, बालकांसाठीची राष्ट्रीय सनद, बालविकास धोरण, लैंगिक गुन्हयापासून बालकांचे संरक्षण अधिनियम राष्ट्रीय बाल हक्क

संरक्षण आयोग, बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम अशा अनेक धोरणात्मक उपाययोजना कायद्याची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. वेगवेगळया विभागाच्या माध्यमातून व आयोगाच्या माध्यमातुन बालकांच्या विकासाच्या दृष्टीकोनातुन पावले उचलली गेलेली आहेत. भारतीय राज्यघटनेने कलम 21 क , 47, 45 व 30 च मध्ये बालकांना शिक्षणाचा हक्क, मुलांचे संगोपन व शिक्षणाची तरतुद करण्यात आली. तसेच पोषणाचा व राहणीमान दर्जा उंचावण्याचा आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे हे राज्याचे कर्तव्य आहे. तसेच बालकांना निरामय पध्दतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्ण वातावरणात आपला विकास करण्यासाठी संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालकांना शोषणापासून आणि नैतिक, भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे अशा तरतुदीचा समावेश घटनेत करण्यात आलेला आहे.

देशात बालकांचा विकास, संरक्षण, हक्क व पुर्नवसनाचे कार्ये करण्यासाठी बालगृहाची स्थापना करण्यात आलेली आहेत. या बालकांची काळजी घेण्याची व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना (चौकशी प्रलंबित असेल त्या काळामध्ये) स्विकारण्यासाठी आणि नंतर त्यांची काळजी घेणे, त्यांच्यावर उपचार करणे, त्यांना शिक्षण देणे, प्रशिक्षण देणे, त्यांचा विकास करणे आणि त्यांचे पुर्नवसन करण्यासाठी बालगृहाची स्थापना करण्यात आलेली आहे. अनाथ, निराधार, हरवलेल्या व काम करणाऱ्या मुलांना बालकल्याण समिती किंवा बालन्यांय मंडळ यांच्या शिफारशीने बाल गृहात प्रवेष दिला जातो. तर बलगृहात मुलांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकीय सेवा, प्रशिक्षण व त्यांचे पुर्नवसनाचे कार्ये केले जाते. प्रस्तुत संशोधन हे बालगृह व बालकांच्या सवंर्धनात व हक्काच्या स्थितीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रस्तुत संशोधनाचे महत्व

1. बालगृहात बालकांना मिळणारे नैसर्गिक हक्क, संविधानीक व मानवअधिकाराच्या दृष्टीकोनातुन मिळणाऱ्या अधिकाराची माहिती या संशोधनाच्या माध्यमातुन होणार आहे.
2. बालकांना संरक्षण व त्यांना घटनेने देण्यात आलेल्या हक्काची जोपासना बालगृहात कशा पध्दतीने होते यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे.
3. बालकांना बालगृहात कोणकोणत्या समस्या व अडचणींना सामोरे जावे लागते हे जाणुन घेण्यासाठी संशोधन महत्वाचे ठरणार आहे.
4. बालकांना बालगृहाच्या माध्यमातून कोणकोणते विकासात्मक तसेच पुर्नवसनाचे कार्ये कितपत घडवून आणले जाते हे अभ्यासण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्वाचे ठरते.

5. बालविकासाच्या दृष्टीने भविष्यात विविध योजना आखणीसाठी व उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासकीय दृष्टया हे संशोधन उपयोगी ठरणार आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जा

बालकांचा स्थानिक पातळीवरून केलेला अभ्यास विभागीय आणि राष्ट्रीय पातळीवर बालकांचा विशेषता : बालगृहातील बालकांचा अभ्यास करून जगाच्या विकसीत आणि अविकसीत भागातील बालकांचा तुलनात्मक विचार करून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर काही उपाय सुचविले जाऊ शकतात. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय बालहक्क, आंतरराष्ट्रीय बालका संदर्भातील कायदे यांच्या आढावा घेऊन त्यांचे संदर्भ अभ्यासले जातील.

राष्ट्रीय दर्जा

भारतात राष्ट्रीय संपत्ती असलेली मुले दुर्लक्षित आहेत. देशाचे शिक्षीत, सुदृढ नागरिक होण्यासाठी जो किमान कौटुंबिक आणि राष्ट्रीय आधार त्यांना मिळाला पाहिजे. या दृष्टीकोनातून वेगवेगळया तरतुदी, योजना अभ्यास समिती राष्ट्रीय पातळीवर आवश्यकतेनुसार गठीत करण्यात आलेल्या आहेत. बालकांच्या समस्या यांचा विचार धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या तज्ञांनी सामाजिक समस्या म्हणून या समस्याचा विचार करून काही कायदे संमत करण्यात आले. देशपातळीवर बालकांच्या हक्का संदर्भात ठोस पावले उचलेली आढळून येतात. त्याच अनुषंगाने राष्ट्रीय पातळीवर काही उपाय सुचवले जातात.

साहित्य परिक्षण

महावर बबीता (२०१७)

बाल कल्याण, संरक्षण व अधिकारा प्रति सर्वच देशाचा सकारात्मक परिणाम राहिलेला आहे. परंतु बालकांची काळजी, संरक्षण व कल्याणासाठी करण्यात येणारे प्रयत्न, जागतिक स्तरावरून आणि राष्ट्रीय, आंतर राष्ट्रीय स्तरावरून करण्यात आलेले असुन ही एक गंभीर समस्या बनलेली आहे.

अरविंद मुरमे (२०१७)

सद्यस्थितीत बालन्यायमंडळापुढे नवीन दुरूस्ती झालेल्या बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ या कायद्यातील नवीन तरतुदीची रीतसर अंमलबजावणी करणे आणि संबंधित यंत्रणेकडून संलग्न असलेली कामे करून घेणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

संभाजी शिंदे (२०१७)

विधिसंघर्ष किंवा संकटग्रस्त मुलांचे पुनर्वसन करताना अनेकदा तांत्रिक अडचणी येतात.

अपुऱ्या प्रशिक्षणामुळे व्यवस्थेतील व्यक्तीकडून अनवधानाने मुलांचे हक्क नाकारले जातात. इथेच आपली भूमिका महत्वाची आहे.

अल्पा व्होरा (२०१७)

अल्पा व्होरा **युनिसेफ, बालहक्क संरक्षण अधिकारी बालन्यायमंडळाच्या भुमिकेवर** मत मांडताना असे म्हणतात की, बालकांसाठी विविध कायदे असले तरी सुविधा, अभ्यासगट, तज्ञ व प्रषिक्षित मनुष्यबळ हवे आहे. वयोगटाप्रमाणे बालकांच्या समस्या व गरजा वेगवेगळया असतात. त्यांची मानसिकता समजून घेता यायला हवी. या कामात केवळ आई-वडील किंवा शिक्षकांना सहभागी करण्यापेक्षा समाजातील प्रत्येक घटकाने सहभागी व्हावे असे मत मांडले आहे.

वैषाली भक्ते, (२०१७)

एक समजासेविका म्हणून **नकोषी मात्र त्यांना हवीहवीशी** या लेखात असे म्हणतात की, या अनाथ मुलांकडे नकोषी या नजरेतून पाहू नका एवढीच समाजाकडून अपेक्षा आहे. या मुलांना प्रेम, माया हवी आहे. करूणा नको, त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे आणि तो मिळवून देण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत असा निर्वाळा त्यांनी दिला.

भास्कर लांडे (२०१६)

यांनी **परभणी जिल्ह्यातील बालगृहाच्या वास्तविक स्थितीचे व बालगृहात** कोणते मुले असतात याचे वर्णन केले आहे. बालगृहात अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बालमजूर, अनौरस, टाकून-सोडून दिलेली-चुकलेली-हरवलेली-घरातून पळून गेलेली मुलं-मुली, वेश्या, कुमारी माता, देवदासी, परित्यक्त्या, विधवा स्त्री-पुरूष व त्यांची मुलं अशांचा समावेश होतो. तर साऱ्या वंचित, उपेक्षितांचे संगोपन, शिक्षण प्रशिक्षणाचे कार्य या बालगृहामार्फत केली जातात. असे त्यांनी बालगृहाच्या स्थितीचे वर्णन केलेले आहे.

देवेंद्र राऊत (२०१६)

सकाळ विशेष लेखात बालगृहासंबंधी माहिती देताना राऊत म्हणतात. की बालकांना हक्कांचे घर, पालक मिळवून द्यावेत हा कायद्याचा उद्देश होता. सरकारच्या आदेशानुसार खऱ्या आणि गरजूंना आधाराश्रमांमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. आई वडील असलेल्या पालकांचा सांभाळ संस्था करू शकणार नाही.

बालधोरण (२०१४), महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

बालधोरण २०१४ मध्ये महिला व बाल विकास विभाग अंतर्गत बालकांच्या विकासासाठी रचनाबध्द, सर्वंकष व नियोजित विकास साधण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न केलेला आहे. या बालधोरणा अंतर्गत बालकांची व्याख्या, बालसंगोपन व विकास, जीवन आणि आरोग्य, पोषण, प्रारंभिक प्रोत्साहन

व शिक्षण जन्मापासुन ते ६ वर्श शिक्षण, हक्क, संरक्षण, राज्य बाल संसाधन केंद्र, बाल विकास निधी, बाल धोरणाची उदिष्टे, बाल विकासात्मक तुरदीचा आढावा घेण्यात आला आहे.

पी.के. कुलकर्णी (२०१३)

यांनी **मानवी हक्कांची ऐतिहासिक पार्श्वभुमी तथा सामाजिक न्यायाचा आढावा** या ग्रंथातुन घेतलेला आहे. या ग्रंथात बालकांचे हक्क, बालक म्हणजे काय, बालकांच्या हक्कांविशयीचे करार, बाल हक्कांचे संरक्षण, बालकांसाठी जागतिक शिखर परिषद जाहीरनाम्याची ध्येये, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरून बालकांविषयीचे घेण्यात आलेले विशेष अधिवेशन, बालहक्क संरक्षण कायदा २००५ त्यासाठीचा आयोग, आयोगाची कार्ये इत्यादी बाबीचा आढावा त्यांनी घेतलेला आहे.

बल्लोरे एस. के. आणि मोरताटे आर.जी.(२०१३)

यांनी **बालकामगार आणि बाल हक्क एक दृश्टीक्षेप** या संशोधन पेपर मध्ये बाल हक्कांचे वर्णन केलेले आहे. बालकामगाराची प्रथा बालकांच्या सर्वच मुलभूत हक्कांना हिरावुन घेणारी समस्या बनली आहे. ही प्रथा थांबविण्यासाठी बालकांच्या सर्वांगिण विकास आणि संरक्षणाच्या हक्कावर मर्यादा घालणाऱ्या विरूध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. बालकल्याण निधीची उभारणी करून बालकांना योग्य त्या मुलभूत आधिकाराची जोपासना होईल अशा उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००६

ज्यामध्ये किशोर बालकांची काळजी, संरक्षण उपचार व पुनर्वसनावर भर दिला गेला आहे. या कायदद्यान्वये बालकांच्या संरक्षणासंबंधी अनेक तरतुदींचा समावेश यात केला आहे. देशात सर्वच राज्यात हा कायदा अस्तित्वात आला आहे. प्रत्येक जिल्हा स्तराव किशोर न्याय बोर्ड व बाल कल्याण समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. ज्या अंतर्गत या कायदद्यातील घटनात्मक तरतुदीचे पालन व बालहक्काची जोपासना, न्याय देण्यात महत्वाची भुमिका राहिलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०००

या कायद्यामध्ये विधीसंघर्षग्रस्त बाळांना आणि काळजी संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना, त्यांच्या विकासात्मक गरजा पुरवून त्यांची योग्य ती काळजी घेणे, त्यांचे संरक्षण आणि त्याच्यांवर उपचार यासाठी तरतुद करणाऱ्या आणि मुलांबरोबरच मैत्रीचा दृष्टीकोन अंगिकारण्याच्या अभिनिर्णयात आणि मुलांच्या सर्वोत्तम हितसंबंधित बाबींच्या पुढील व्यवस्थेसाठी आणि या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या विविध संस्थांमार्फत त्यांचे अंतिम पुनर्वसन करण्यासंबंधी, कायद्याचे एकत्रिकरण करणे व त्यात सुधारणा करणे यासाठी अधिनियम संविधानात अनुच्छेद १५ चा खंड (३), अनुच्छेद

३६ चे खंड (ड), आणि (च), अनुच्छेद ४५ आणि ४७ यांसह विविध तरतुदीमध्ये राज्यांवर, मुलांच्या सर्व गरजा भागविण्यात आल्या आहेत. आणि त्यांचे मुलभूत मानवी अधिकार पुर्णतः सुरक्षित आहेत याची सुनिश्चिती करण्याची प्राथमिक जबाबदारी लादली आहे.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश

1. बालक व बालहक्क संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. बालगृहातील बालकांच्या वैयक्तिक, कौंटूबिक सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. बालगृहात बालकांचे हक्क व संरक्षणाच्या हक्काची कितपत जोपासणा होते यांचा अभ्यास करणे.
4. बालकांना बालगृहात मिळणाऱ्या सेवा, सुविधांचा अभ्यास तथा येणाऱ्या समस्येचा व अडचणीचा अभ्यास करणे.
5. बालसंवर्धनात विकासात्मक गरजा पुरवण्या व बालकांची काळजी घेण्यासंबंधी बालगृहाची भूमिका अभ्यासणे.
6. बालगृहात बालकांना मिळणारे नैसर्गिक हक्क, संविधानीक व मानवअधिकाराच्या दृष्टीकोनातुन कशा पध्दतीने मिळतात यांचा अभ्यास करणे.
7. बालगृहामध्ये राहणाऱ्या मुलांना येणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.

प्रस्तुत संशोधनाचे गृहितकृत्ये

1. बालकांना बालगृहात संरक्षण, संकटकाळात मदत व सुरक्षितता मिळते.
2. बालकांच्या पुर्नवसन कार्यासंबंधी बालगृहे चांगल्या प्रकारची भूमिका बजावत आहेत.
3. बालगृहात बालकांना मिळणारे नैसर्गिक हक्क, संविधानीक व मानवअधिकाराच्या दृष्टीकोनातुन शासकीय देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा बाबत उल्लघन होताना दिसुन येते.
4. शासकीय व निमशासकीय प्रभाव कमी असल्यामुळे बालगृहातील बालकांच्या समस्याची योग्यरित्या सोडवणूक होत आहे.
5. बालगृहातुन बाहेर येणाऱ्या मुलांना समाज स्विकारत आहे.

संशोधन पध्दती

मराठवाडयात सर्वात जास्त बालगृहे आहेत. **मराठवाड्यातील बालगृहातील बालकांच्या हक्क व संवर्धनामध्ये बालगृहांची भूमिका** हा विषय अभ्यासण्यासाठी खालील पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही बालकांच्या विकासात्मक गरजा पुर्ती, संरक्षण, पुर्नवसन, बालहक्कासंबंधी बालगृहात राबविण्यात येणाऱ्या योजना व भूमिकेचा आढावा व बालकांना बालगृहात येणाऱ्या समस्या, अडचणी, मिळणारी वागणुक, बालगृहाप्रती बालकांचा दृष्टीकोन, बालगृहात बालकांना मिळणारे नैसर्गिक हक्क, संविधानीक व मानवअधिकाराच्या दृष्टीकोनातुन आवश्यक त्या माहितीचा अभ्यासापुरतेच या संशोधनाचे क्षेत्र आहे. संशोधन क्षेत्राची व्याप्ती ही मराठवाड्यातील शासकिय बालगृहातील अभ्यासपुरतीच मर्यादित करण्यात आलेली आहे.

संशोधन आराखडा

अभ्यास विषयासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाचा वापर करण्यात येणार आहे. कारण प्रस्तुत संशोधन प्रश्नांच्या अनुषंगाने समस्यांच्या व बालविकास सरंक्षण, बाल हक्क अधिकार व पुर्नवसन, मिळणाऱ्या सेवा सुविधा, समस्या, अडचणी व त्या समस्यांचे निदान करणे गरजेचे असल्याने या संशोधनासाठी समग्र संशोधन आराखडयापैकी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरणे योग्य असल्याचे आढळून येते. यासाठी हे संशोधन शास्त्रशुध्द पध्दतीने असावे म्हणून अन्वेषणात्मक संशोधन आराखडयाची संशोधनासाठी मदत घेण्यात येणार आहे.

नमूना निवड

मराठवाडयात सर्वाधिक बालगृहाची संख्या आहे. संशोधनाला निश्चित दिशा मिळावी यासाठी मराठवाडयातील एकूण आठ जिल्हयातील बालगृहाचा अभ्यास करण्यात येणार आहे. गैरसंभाव्यता नमुना निवडीतील सहेतूक पध्दतीचा अवलंब करून मराठवाड्यातील आठ जिल्हयातील प्रत्येकी एक शासकिय बालगृहाची निवड करून प्रत्येक बालगृहातून 25 बालकांची उद्देश्यपूर्ण नमूना निवड पध्दतीचा वापर करून 25 X 8 = 200 बालकांची निवड करण्यात येईल. तसेच 12 X 8 = 96 याप्रमाणे बालगृहामध्ये काम करणाऱ्या 96 लोकाची निवड करण्यात येईल.

तथ्य संकलन

कोणत्याही संशोधनात तथ्ये महत्वाची असतात. कारण तथ्याच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून तथ्यांचे शास्त्रीय संकलन करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनाचे तथ्य संकलन हे दोन प्रकारे करण्यात येणार आहे. या संशोधनात प्राथमिक तथ्य व दुय्यम तथ्य यांचा समावेश करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत

प्राथमिक तथ्य या पध्दतीमध्ये मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात येणार आहे. कारण ही पध्दत प्राथमिक तथ्य संकलन करण्यासाठी सर्वसमावेशक असून या पध्दतीद्वारे शास्त्रशुध्द व मौलिक तथ्य संकलन करता येऊ शकते. ही मुलाखत अनुसूची संशोधन उदिष्टांना संशोधन प्रश्नांना अनुसरून जास्तीत जास्त बंदिस्त तर काही अंशी खुली अशा मिश्र स्वरूपाची तयार करण्यात येणार आहे. यात जास्तीत जास्त मुलाखत अनुसूची व थोडक्यात सहभागी निरीक्षण या आधारावरच प्राथमिक तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत

दुय्यम तथ्य संकलन पध्दतीमध्ये लिखित दस्तवेज, वार्षिक अहवाल, संबंधीत संदर्भ ग्रंथ, शोधप्रबंध, विषयासंदर्भात मासिक, पाक्षिक, मॅगझिन संशोधन लेख, दैनिक वृत्तपत्र, संपादित लेख, बालगृहातील लिखित दस्तवेज तसेच महिला व बाल विकास मंत्रालयाचे वार्षिक प्रगती अहवाल, बालकासंबंधी विविध अधिनियम व कायद्याचा आधार, भ्रमणध्वनी, संकेत स्थळ, परिसंवाद पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य विश्लेषन

संकलित केलेल्या माहितीचे (SPSS) या संगणीकृत प्रणालीद्वारे विश्लेषन करून निष्कर्ष काढण्यात येतील.

संशोधनाची प्रकरण रचना

प्रकरण पहिले : बालगृह स्वरूप आणि कार्य व बाल अधिकार

प्रकरण दुसरे : मराठवाडा एक दृष्टीक्षेप

प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती व संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण चौथे : बालहक्क संवर्धनामध्ये बालगृहांची भुमिका

प्रकरण पाचवे : निष्कर्ष, सारांश, गृहीतकृत्याची तपासणी, समाजकार्य प्रारूप व सुचना

संदर्भ सूची

1. बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०००
2. मुकुंद किणीकर, 1991 : शासन आणि स्वंयसेवी संस्थाचे सहकार्य, योजना मासिक, डिसेबर.
3. जीवनराज गांधी, 1981 : नागरिक समाज और स्वेच्छिक संस्थाची भुमिक, योजना मासिक, फेब्रुवारी.
4. आन्द्रे बैतेयी, 2003 : नागरिक समाज और स्वैच्छिक संगठन, जनवरी 2003
5. बोधनकर सुधीर 1999 : सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.
6. घाटोळे रा.ना. 1997 : समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर
7. भारताचे संविधान, 94 व्या संविधान सुधारणेपर्यंत अद्यायावत 2007

संशोधक	**मार्गदर्शक**
कंधारकर हनमंत	**डॉ. घनःश्याम येळणे**